# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ४००-२२ दिनांक २९/१२/२०२२

## खाजगी कन्स्ट्रक्शन कंपनीमध्ये काम करणाऱ्या ट्राफिक मार्शल यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने गंभीर दुखापत करण्याऱ्या संशईतांना अटक.

दिनांक-२४/१२/२०२२ रोजी शताब्दी हॉस्पीटल, कांदीवली, मुंबई येथुन नवघर पोलीस ठाणे येथे संदेश प्राप्त झाला की, इसम नामे फिर्यादी जावेद नियाज अहमद खान, वय २७ वर्ष धंदा- नोकरी (जयकुमार कंन्ट्रक्शन कंपनी) ट्राफीक मार्शल, रा. मिरारोड पुर्व तसेच त्याचा मित्र इसम जाफर जावेद खान, वय २६ वर्षे, धंदा-नोकरी, मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे यांना दिपक हॉस्पिटलजवळ, मिरा-भाईंदर रोड येथे ०७ ते ०८ अनोळखी इसमांनी दिनांक २४/१२/२०२२ रोजी पहाटे-०४.०० वा सुमारास मॅक्डोनल्ड हॉटेल येथे कर्तव्य बजावतेवेळी झालेल्या शिवीगाळीचे कारणावरुन फिर्यादी व त्यांचा मित्र सादीक खान यास हाताने मारहाण करुन दुखापत तसेच फिर्यादी यांचे दुसरे मित्र व वरील नमुद साक्षीदार जाफर यांचे छातीवर कशानेतरी वार करुन जखमी केलेले आहे. तसेच पोटामध्ये चाकु भोकसुन तीन वार करुन जिवे ठार मारण्याचे उद्देशाने गंभीर दुखापत केलेली आहे. त्याप्रमाणे फिर्यादी जावेद खान यांचे तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ९९३/२०२२ भा. दं. वि. कलम ३०७, ३२६, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८, १४९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा हा जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने केलेला गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार नमुद गुन्हयाचा तपास सुरु करुन प्रथम गुन्हयाच्या घटनास्थळाला नवघर पोलीस ठाण्याच्या तपासपथकाने भेट देवून प्राथमिक पुरावे व माहिती हस्तगत केली. त्यानंतर सदर आरोपी यांचा भाईंदर-पश्चिम येथे शोध घेत असताना सदर आरोपी हे शिवसेना गल्ली येथील असल्याची माहीती प्राप्त झाली. त्या अनुषंगाने सदर आरोपी यांचा शिवसेना गल्ली परिसरात शोध घेवुन नमुद गुन्हयात सहभाग असलेले आरोपी नामे १) हरीओम लालमन धिवर वय- २० वर्ष २) मोनु राजेन्द्रप्रसाद आंबेडकर, वय १८ वर्ष ३) निखिल रामसजन गुप्ता, वय- १९ वर्ष ४) कृष्णा विरेन्द्र कनोजिया, वय- २० वर्ष ५) अमित मंगलप्रसाद सोनी वय- १९ वर्ष ६) अखिलेश अजय यादव वय-१९ वर्षे सर्व रा- शिवसेना गल्ली, भाईंदर-पश्चिम, ठाणे यांना दिनांक २६/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच अटक आरोपी यांचे दोन साथीदार हे विधीसंघर्षग्रस्त बालक यांनादेखील दि.२६/१२/२०२२ रोजी ताब्यात घेवुन कारवाई करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयातील वरील अटक आरोपी यांच्याकडे पोलीस कस्टडी दरम्यान तपास करुन तसेच विधीसंघर्षग्रस्त बालक यांच्याकडे चौकशी करुन त्यांनी गुन्हयात वापरलेले हत्यार हस्तगत करण्यात आलेले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि हनमंत पडळकर हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, श्री प्रकाश मासाळ, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, सपोनि/हनमंत पडळकर,

पोउनि/अभिजित लांडे, पोहवा-०७०९७/भुषण पाटील, पोहवा-०४००४/गणेश जावळे, पोहवा-०७१६२/सुरेश चव्हाण, पोह-१२०१८/नवनाथ घुगे, पोह-०००२०/जयप्रकाश जाधव, पोना/०५००५ बनसोडे पोशि-१३११८/ओंकार यादव, पोशि-१३०७८/सुरजसिंग घुनावत, पोशि-१७०४६/विनोद जाधव यांनी केलेली आहे.

--------------oo---------------